PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 2

# '२०१६-२०१७ मधील भारताचे संरक्षण अंदाजपत्रक'

**डॉ. बी. डी. तोडकर**
**विभाग प्रमुख**
**संरक्षण आणि सामरिकशास्त्र**
**न्यू आर्ट्स कॉमर्स एंड साइंस कॉलेज,**
**अहमदनगर. महाराष्ट्र**

## प्रस्तावनाः

२९ फेब्रुवारी २०१६ ला मोदी सरकारच्या वतीने लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी आपला २०१६ - १७ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मांडताना सुमारे एक तास चाळीस मिनिटांच्या भाषणामध्ये एकदाही त्यांनी संरक्षण क्षेत्राचा, संरक्षण बजेटचा उल्लेख न केल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वास्तविक पाहता आपल्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी सरकार किती खर्च करते, याकडे त्या देशातीलच नव्हे, तर संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले असते. अमेरिका आणि चीन यांचा संरक्षण क्षेत्रातील खर्च व भारत संरक्षणावर करत असलेला खर्च याची नेहमीच तुलना होत असते. त्यामुळे सर्वांचे लक्ष अर्थसंकल्पात संरक्षणात होत असलेल्या तरतुदींच्या आकडेवारीकडे असते.

मात्र केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटलींच्या भाषणामध्ये जरी संरक्षण बजेटचा उल्लेख नसला तरीही अर्थसंकल्पाच्या दस्तावेजात २०१६ - २०१७ या वर्षासाठी संरक्षणासाठी दोन लाख ४९ हजार ९९ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. जी गेल्या वर्षापेक्षा १३ टक्क्यांनी अधिक आहे. मागील म्हणजेच २०१५ - २०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्री अरूण जेटली यांनी संरक्षण बजेटमध्ये ७.७ टक्क्यांची वाढ करत, ते २.४६ लाख कोटी इतके केले होते. या अर्थ संकल्पावर विविध वृत्तपत्रांमधून अनेक विचारवंतांनी आपले याविषयीचे विचार मांडले, त्यावरून या अर्थसंकल्पाबाबत आपणही लिहावे म्हणून केलेला हा खटाटोप.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१ संरक्षणाचे अंदाजपत्रक म्हणजे काय याचा आढावा घेणे.
२ संरक्षणाचे अंदाजपत्रकातील निधी संरक्षण क्षमतेसाठी अपुरा आहे याचा आढावा घेणे.
३ संरक्षण खर्चाची विभागणी कशी केली जाते हे अभ्यासणे.
४ अपु-या निधीमुळे आधुनिकिकरणाला खीळ बसण्याची शक्यता आहे याचा आढावा घेणे.
५ 'मेक इन इंडिया' धोरणाला बळकटी देण्यासाठी करसवलती याचा अभ्यास करणे.
६ चीनचा सैन्यावरील खर्च आणि भारतीय सुरक्षा यांचा अभ्यास करणे.

**अर्थसंकल्प म्हणजे काय:**

अर्थसंकल्पाला इंग्रजीत 'बजेट' (**Budget** असे म्हटले जाते. 'बजेट' ( **Budget** या शब्दाची उत्पत्ती 'बूजे' (**Budge** या फ्रेंच शब्दपासून झालेली आहे. वास्तविक पाहता 'बूजे' या शब्दाचा अर्थ 'छोटी पिशवी' असा आहे. १७३३ मध्ये इंग्लंडचे त्यावेळचे अर्थमंत्री सर रॉबर्ट वॉलपोल यांनी आपला बजेट प्रस्तावाचा दस्तऐवज एका पिशवीत ठेवून ही पिशवी घेऊन ते सदनात आले होते. तेव्हापासून बजेट ( **Budget** हा शब्द प्रचलित झाला. मात्र भारतीय संविधानात 'बजेट' या शब्दाचा उल्लेख कोठेही केलेला दिसत नाही. संविधानाच्या अनुच्छेद ११२ मध्ये बजेटला (अर्थसंकल्प किंवा 'वार्षिक आर्थिक विवरण' असे स्वरूपाचे नाव देण्यात आलेले आहे. वार्षिक आर्थिक विवरणात केंद्र सरकार मिळकत आणि खर्चाचा लेखाझोखा संसदेत सादर करते. याच लेखाझोखात संरक्षणावरील खर्चाच्या तरतुदी दिलेल्या असतात.

देशाच्या संसदेपुढे विचारार्थ ठेवावयाच्या वित्तीय शिफारशी ज्यामध्ये आहेत, अशी कागदपत्रे म्हणजे बजेट किंवा अंदाजपत्रक होय. सरकारच्या अर्थव्यवहाराची संपुर्ण कल्पना येण्याचे चांगले साधन म्हणजे अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्प होय. ज्या वर्षाचा अर्थसंकल्प असेल, त्या वर्षातील अपेक्षीत खर्च, ज्या बाबीवर तो खर्च व्हावयाचा त्यांची तपशीलवार यादी, त्या वर्षाचे अपेक्षित उत्पन्न व ते कोणकोणत्या मार्गांनी मिळवायचे यासंबंधीचा तपशील देणारे पत्रक, अशी अंदाजपत्रकाची व्याख्या करता येईल.

दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात संसदेमध्ये देशाचे आर्थिक अंदाजपत्रक देशाचे अर्थमंत्री सादर करतात. त्या अंतर्गतच संरक्षणाचे अंदाजपत्रक सादर केले जाते. तसेच भारतात संरक्षणसाठीची अर्थसंकल्पातील तरतूद ही नेहमीच चर्चेचा विषय राहिलली आहे. विविध साहित्याचा खरेदीवरून नेहमी वादात राहिलेले हे एकमेव खाते आहे. भारतीय संरक्षण अंदाजपत्रकाचा सर्वांगिण अभ्यास व सद्यस्थिती समाजापुढे मांडण्याचा मुख्य हेतू हा लेख लिहिण्यामागे आहे.

**संरक्षण क्षमतेसाठी निधी अपुरा:**

अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी २०१६-१७ या वर्षासाठी करण्यात आलेली एकूण वाढ १.१६ टक्के इतकी आहे. वाढती महागाई लक्षात घेता किमान सहा ते सात टक्क्यांचा निधी वाढवून देणे गरजेचे होते. गेल्या १५ वर्षातील ही सर्वात कमी वाढ आहे. चालू आर्थिक वर्षाकरिता संरक्षण क्षेत्रासाठी २.३३ लाख कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. आता पुढील वर्षासाठी ती २ लाख ५८ हजार लाख कोटी रूपये इतकी राहणार आहे. वरकरणी हा आकडा मोठा वाटत असला, तरी तो देशाच्या सुरक्षा व्यवस्थेच्या गरजेपेक्षा किंवा संरक्षण क्षमतेसाठी खूपच अपुरा आहे.

आर्थिक सर्वेक्षण पाहणी अहवालानुसार संरक्षण मंत्रालयाला गतवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदीपैकी १८ टक्क्यांहून अधिक रक्कम खर्च करता आलेली नाही. याचे कारण ठरले आपल्याकडील किचकट नियम आणि आळशी नोकरशाही. या दोहोंमुळे आपला आधुनिकीकरणाचा वेग कमी झालेला आहे. आता अर्थसंकल्पातील तरतुदींची जोड लाभून आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या राज्यकारभाराच्या पद्धती पारदर्शक आणि वेगवान बनतील अशी अपेक्षा आहे.

**संरक्षण खर्चाची विभागणी :**

संरक्षण अर्थसंकल्पाचे महसुली खर्च आणि भांडवली खर्च असे दोन प्रमुख घटक आहेत.

१ **महसुली खर्च :** महसुली खर्चातून युद्धसामग्रीपूर्ती आणि युद्धसरावासाठी लागणारा दारूगोळा, इंधन, रसद, तसेच वेतन, लष्करी संपदेची देखभाल, छावण्याचा खर्च (जमिनजुमला,इमारती, पाणीपुरवठा, रस्ते, सफाई इत्यादी अशा अनेक गरजा भागविण्यात येतात.

२ **भांडवली खर्च :** भांडवली खर्चातून नवी शस्त्रसामग्री, नवीन ठाणी उभी करणे व आधुनिकीकरण यासाठी लागणारा खर्च भागविला जातो.

महसूली खर्च व भांडवली खर्च यांचे प्रमाण अर्थसंकल्पात अनुक्रमे ६० व ४० टक्के असायला पाहिजे.पण आपल्याकडे ते ८० आणि २० टक्के आहे.यामुळे संरक्षणाची तरतूद नेहमीच गरजेपेक्षा कमी होते.शिवाय सर्व खर्च वजा जाता केवळ १० ते १२ टक्के भांडवली खर्चाची रक्कम शिल्लक राहते.

नव्या अर्थसंकल्पात २.५८ लाख कोटींपैकी १.५५ लाख कोटी महसूल खर्चासाठी आणि फक्त १.0३ लाख कोटी भांडवल खर्चासाठी लागतील.या तरतूदींनी सेनादलांच्या दैनंदिन गरजा (महसूली खर्च भागतील, परंतु त्यांच्या युद्धसाहित्यात आधुनिक शस्त्रांची, दारूगोळयांची व यंत्रणेची भर पडणार नाही.कारण या तरतुदींपैकी १.६२ हजार कोटी महसुली खर्चावर म्हणजेच पगार भत्ते देण्यात खर्च होणार आहे.हा खर्च टाळता येत नाही.संरक्षण दलांचे आधुनिकीकरण हे प्रामुख्याने नवी संरक्षणसामग्री खरेदी करण्यावर (कॅपिटल बजेट -भांडवली तरतुदींवर अवलंबून असते.यावेळची भांडवली तरतूद ७८ हजार ५८६ कोटींची आहे, जी नवीन संरक्षणसामग्रीच्या खरेदीसाठी वापरली जाईल.या रकमेतील ६0 टक्के आधीचे खरेदी व्यवहार पूर्ण करण्यासाठी खर्च होतील,तर नव्या खरेदीसाठी फक्त ४0 टक्के उरतील.गतवर्षीच्या तुलनेत ही रक्कम ८.५ टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे.

**आधुनिककिरणाला खीळ बसण्याची शक्यता:**

देशाच्या संरक्षणाचा प्रश्न देशात सरकार कोणाचेही असो ते गांभीर्याने विचार करताना दिसत नाही.अरूण जेटलींनी जो अर्थसंकल्प सादर केला त्यात लष्कराच्या आधुनिककिरणासाठी ठोस कार्यक्रम दिसत नाही.

वास्तविक पाहता संरक्षण मंत्रालय आणि सैन्यदलांचा भर आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञान यावर असतो.म्हणजेच युद्धक्षमता राखण्यासाठी व नवी आव्हाने पेलण्यासाठी सैन्यदलांना सक्षम करणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यांची युद्धसामग्री आणि शस्त्रे योग्य,आधुनिक असावीत, परंतु व्यवहारिकदृष्टया ते शक्य होत नाही.जगातल्या कुठल्याही सेनादलांकडे असलेले युद्धसाहित्य साधारणपणे तीन गटात विभागले जाते.अत्याधुनिक, आधुनिक आणि जुने.

अत्याधुनिक साधनांची टक्केवारी जितकी जास्त आणि जुन्या आयुधांची किंवा उपकरणांची कमी, त्या प्रमाणात युद्धक्षमता जास्त किंवा कमी होऊ शकते.१९६२ च्या भारत-चीन युद्धात भारतीय सेनादलांची युद्धसामग्री किमान २0 वर्षे जुनी होती.साहजिकच नामुस्की पदरात पडली.याउलट १९६३ ते १९७0 या काळात आधुनिक शस्त्रांनी सज्ज झालेल्या सेनादलांनी १९६५ मध्ये विजय मिळविला आणि १९७१ मध्ये तर विजयाची परिसिमा गाठली.आधुनिक काळात युद्धनीती व युद्धशास्त्र यात बदल झाले आहेत.तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शस्त्रे,साहित्य आणि विध्वंशक शक्तीतही वाढ झाली आहे.या सर्व साधनांच्या किमतीही भरमसाठ झाल्या आहेत.लढाऊ विमाने, पाणबुडया, तोफांच्या किमती हजारो कोटींच्या घरात जाऊन पोचल्या आहेत.

आजवरचे भारतीय अर्थसंकल्प पाहिले असता संरक्षणासाठीची तरतूद ही दरवर्षी ६ ते ८ टक्क्यांनी वाढत गली होती, हे आपण लक्षात घेतले पाहिजे की, भारत आयात करत आलेल्या शस्त्रांस्त्रांच्या किमंतीमध्ये दरवर्षी साधारणपणे १0 ते १२ टक्क्यांनी वाढ होत असते.त्यामुळे आधुनिकीकरणासाठी फारसा निधी राहत नाही.आजवर आधुनिककिरणाला खीळ बसण्यास हीच गोष्ट कारणीभूत होती.

शस्त्रास्त्रे किंवा हत्यारांच्या बाबतीत भारत हा जगातला सर्वात मोठा आयातदार देश आहे. आपण अमेरिका, इस्त्रायल, रशियाकडून लष्कर, नौदलासाठी हत्यारे, उपकरणे, विमाने, बोटी विकत घेतो. तरीही आज उद्या युद्ध सुरू झाले तर आपले लष्कर जुनाट शस्त्रांनीच प्रत्युत्तर देतील. आजच्या युगातले युद्ध लढण्यासाठी तितकीच अत्याधुनिक शस्त्रे आवश्यक आहेत. आपल्याकडे आजही मीग-२१ चा वापर होतो. बोफोर्सनंतर सैन्याकडे एकही आधुनिक तोफ नाही. तसेच संरक्षण खरेदीच्या वाटाघाटी कित्येकदा व-याच लांबतात आणि त्यासाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद खर्चच होत नाही. त्यामुळे यंदा अशा खरेदी आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच करण्याच्या सूचना संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत.

अशा परिस्थितीत संरक्षणासाठीची तरतूद आणखी वाढणे अपेक्षित होते, पण तसे झालेले नाही. यंदा संरक्षणासाठीच्या तरतूदींमध्ये पेन्शन बिलही समाविष्ट आहे. वास्तविक, आजवर ते स्वतंत्र असायचे, पण यंदा ते संरक्षणासाठीच्या तरतुदीत आल्याने एकूण तरतूद वाढल्यासारखी दिसत असली, तरी पेन्शनचा भार पेलून आधुनिकीकरणासाठी यातून अपेक्षित निधी उरणार नाही. भारतीय सैन्याच्या आधुनिकीकरणासाठी २५ वर्षाचा दीर्घकालीन आराखडा बनवण्यात आला आहे. त्यानुसार आपण नवीन शस्त्रास्त्रे खरेदी करणार आहोत. हवाईदलाला १२५ नवीन राफेल जेट विमाने विकत घ्यायची आहेत. नौदलासाठी नवीन पाणबुडया आणि इतर साधनसामग्रीची गरज आहे. आज आपल्या पाणबुडयांची संख्या १३ आहे, प्रत्यक्षात ती २५ असणे आवश्यक आहे. सैन्यदलातील रणगाडे, तोफा आणि इतर साधनसामग्री जुनाट झालेली असून, ती बदलणे गरजेचे आहे. या सर्वांसाठी प्रचंड मोठया प्रमाणात निधीची गरज आहे. आगामी काळात 'मेक इन इंडिया'अंतर्गत काही करार झाल्यास ही तरतूद वाढण्याची शक्यता आहे.

सरकारच्या मनात आले तर आपण आपल्याच देशात हवी तितकी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे निर्मान करू शकतो. अशी शस्त्रे, उपकरणे निर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेली परिपूर्ण ताकद आपल्या देशाकडे आहे. पण इंदिरा गांधींनंतर वेळोवेळी सत्तेत आलेल्या सरकारांनी ही ताकद मारून काढण्याचेच काम केले. लष्कर, वायूदल, नौदलाला आवश्यक असलेली अत्याधुनिक शस्त्रे, उपकरणे आपल्या देशात तयार झाली तर त्यांच्या खरेदीवर होणारा खर्च वाचू शकेल. तसेच त्यातून रोजगार निर्मितीही होईल. वाचलेला पैसा संरक्षणासाठीच ठोस उपाययोजनांवर खर्च करता येईल.

यंदा तिन्ही संरक्षण दलांना नवी शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी व आधुनिकीकरणासाठी ७८,५८६.६८ काटी रूपये उपलब्ध असणार आहेत. म्हणजेच गेल्या वर्षापेक्षा यंदा यासाठी केवळ ४,२८७.0७ कोटी रूपये इतकीच रक्कम वाढवून मिळाली आहे. याचे एक कारण असेही असू शकते की गत वर्षी संरक्षण दले त्यांच्या तरतुदींपैकी सर्व रक्कम खर्च करू शकली नव्हती. असे असले तरी देशाचे रक्षण करणा-या सैन्याच्या आधुनिकीकरणासाठी दिर्घकालीन, ठोस कार्यक्रम आखून अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव तरतूद करणे अपेक्षित होते. पण या अर्थसंकल्पात तशी तरतूद दिसत नाही.

**'मेक इन इंडिया' धोरणाला बळकटी देण्यासाठी करसवलती :**

यंदाचा अर्थसंकल्प हा धोरणात्मक बदल आणि आगामी काळातील दिशा यावर लक्ष ठेवून सादर करण्यात आला. गेल्या दोन वर्षापासून सरकारने 'मेक इन इंडिया'उपक्रमांतर्गत संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने टाकलेली पावले पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पातून स्पष्ट होताना दिसतो. आज भारताची अर्थव्यवस्था ही ७.६ टक्क्यांनी वाढत आहे. म्हणजेच देशाचे उत्पन्न वाढत आहे. उत्पन्न वाढल्यानंतर साहजिकच संरक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रावर तरतूद वाढतच आहे. सध्याची देशाची आर्थिक वाटचाल पाहता आगामी काळात संरक्षणासाठीची तरतूद निश्चितपणाने पुढच्या तीन वर्षात वाढतच जाईल, याबाबत शंका नाही.

या अर्थसंकल्पाचा भर हा प्रामुख्याने भारताला जगाचा कारखाना बनवणे यावर होता. त्यानुसार 'मेक इन इंडिया' धोरणाला बळकटी देण्यासाठी अनेक करसवली जाहीर करण्यात आल्या. यापैकी एक म्हणजे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देशांतर्गत

म्हणजेच पूर्णपणे भारतात बनवणा-या उद्योजकांना करसवलत मिळणार आहे.याचा फायदा शस्त्रास्त्रांची आयात कमी होण्यावर आणि भविष्यात शस्त्रास्त्रांचा निर्यातदार देश बनण्याच्या संकल्पाला होणार आहे.

लार्सन अँड टुब्रोसारख्या कंपन्या पाणबुडया बनवू शकतील,भारत फोर्ज तोफा बनवू शकतील आणि टाटासारखी कंपनी अत्याधुनिक विमाने बनवू शकणार आहे.याखेरीज 'स्टार्ट अप'या योजनेंतर्गत नवीन कारखाने तयार करण्यासाठी करसवलती देण्यात आल्या आहेत.त्यानुसार, अशा उद्योगांना सुरूवातीची तीन वर्षे कुठलाही कर लावण्यात येणार नाही. लघु आणि मध्यम उद्योगधंद्यांना यामुळे प्रोत्साहन मिळणार आहे.सैन्यासाठी लागणारे छोटे - मोठे साहित्य आज आपण परदेशातून आयात करत असतो.आगामी काळात तेही भारतात बनविले जाण्याची शक्यता बळावली आहे.

**संशोधन आणि विकासावर भर :**

संशोधन आणि विकास (रिसर्च अँड डेव्हल्पेंट संरक्षण विभागातील महत्त्वाचा भाग आहे.आज या संस्थेत ५० प्रयोगशाळा, पाच हजार वैज्ञानिक आणि इतर सेवकवर्ग आहे, पण अजूनही स्वयंपूर्णतेत आपण मागे आहोत.म्हणून आपणास आधुनिक शस्त्रे, विमाने, युद्धनौका आणि पाणबुडया आयात कराव्या लागतात.ही खेदाची गोष्ट आहे.तसेच भारतामध्ये नवउद्योजकांकडून रिसर्च अँड डेव्हलपेंट किंवा संशोधन हे फारसे होत नाही.अशा प्रकारचे संशोधन देशांतर्गत शस्त्र उत्पादन आणि नवे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी व्हावे, यासाठी अधिक प्रोत्साहन मिळावे म्हणून या वर्षीच्या अंदाजपत्रकात या क्षेत्रासाठीही करसवलती देण्यात आल्या आहेत.त्यामुळे आगामी काळात संशोधनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**पायाभूत सुविधांचा फायदा :**

केंद्रीय अंदाजपत्रकात आकडेवारीचा उल्लेख केला नसला तरी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केलेल्या भरीव तरतुदींचा फायदा संरक्षण क्षेत्राला होईल, असे दिसते.कारण गेल्या दोन वर्षामध्ये इतिहासात प्रथमच देशात सर्वाधिक म्हणजे ६,५00 किलोमीटरहून अधिक रस्ते बांधण्यात आले.आता नव्या धोरणामुळे रस्ते, रेल्वे, विमानतळ या पायाभूत सुविधांना चालना मिळणार आहे.याचा फायदा भारतीय सैन्य दलालाही होणार आहे.कारण, आपले रस्ते ईशान्य भारतात म्हणजेच चीनच्या सीमेवर आणि पाकिस्तानच्या सीमेपासून खूपच मागे आहेत.तिथे तातडीने रस्ते बनविण्याची गरज आहे.याशिवाय आपल्या रेल्वेलाईन डोंगराळ भागामध्ये पोहोचलेल्या नाहीत.आपल्या विमानतळांची संख्याही कमी आहे.आता आगामी पाच ते सात वर्षामध्ये या उणिवा दूर होण्याच्या दिशेने पावले पडतील हे अर्थसंकल्पाने स्पष्ट केले आहे.

**जीडीपीच्या तुलनेत संरक्षण खर्च :**

सेनादलांना जी आव्हाने पेलावी लागणार आहेत त्यासाठी त्यांना सक्षम करायला हवे.१९४७ ते १९६२ या काळात युद्धावर जीडीपीच्या केवळ १.६९ टक्क तर १९६३ ते १९८८ च्या दरम्यान ३.१ टक्के खर्च करण्यात आला, तेव्हा आपल्या सेनादलात आधुनिक तोफा, विमानवाहू जहाज, मिग लढावू विमाने यांचा समावेश करण्यात आला.त्यानंतर मात्र ही टक्केवारी १.७ च्या आसपास राहिली आहे.नवीन अर्थसंकल्पातही ही टक्केवारी केवळ १.७५ आहे.सेनादलांना योग्य क्षमता गाठावयाची असेल, तर त्याकरिता जीडीपीच्या ३ टक्के निधी नियमितपणे संरक्षण खात्याला द्यायला हवा.युद्धप्रसंगीच नव्हे, तर अंतर्गत कलह निवारण, पूर व भूकंप अशा परिस्थितीमध्येही सेनादलांनी कामगिरी चोखपणे बजावली आहे.त्यांना सक्षम ठेवण्यासाठी योग्य तरतूद करणे हे सरकारचे कर्तव्य तर आहेच,पण दीर्घकालीन सुरक्षिततेसाठी आणि राष्ट्रहितासाठी राष्ट्रीय निधीची अर्थसंकल्पाद्वारे सुयोग्य गुंतवणूक करणे इष्ट आहे.

सर्वसाधारणपणे भारत आपल्या जीडीपीच्या तुलनेत संरक्षणावर १.७४ टक्के खर्च करतो. अमेरिका जीडीपीच्या ४ टक्के संरक्षणावर खर्च करतो. पाकिस्तान आणि चीन ही आपली शेजारी शत्रू राष्ट्रे जी.डी.पी.च्या साडेतीन ते चार टक्के पैसे संरक्षण क्षेत्रावर खर्च करतात. चीनचे संरक्षण बजेट हे आपल्या संरक्षण बजेटच्या कमीत कमी तिप्पट आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेची गती मंदावली असली, तरी त्यांनी गतवर्षी अर्थसंकल्पात संरक्षणावरील तरतुदींत १0 टक्के वाढ केलेली आहे. लागोपाठ पाचव्या वर्षी चीन संरक्षणखर्चासाठीच्या तरतुदीत वाढ करत आलेली आहे. प्रादेशिक व सागरी वादविवादांमुळे जगातील सर्वांत जास्त सैन्य असलेल्या चीनने लष्कराचे आधुनिकीकरण करण्यासाठी गतवर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये संरक्षण खर्चासाठी १४५ अब्ज डॉलर्सची तरतूद केली. सध्या भारत आणि पाकिस्तान सीमेवर अशांतता आहे. देशासमोर असणारी अंतर्गत आणि बाह्यसुरक्षेची आव्हाने वाढतच चाललेली आहेत. हे लक्षात घेता आपल्याला संरक्षण क्षेत्रासाठीची तरतूद ही चीनच्या बरोबरीने किंवा त्याही पुढे नेण्याची आणि त्यातून संरक्षण दलातील उणिवा भरून काढण्याची गरज आहे.

**टिकेची झोड :**

अर्थमंत्री अरूण जेटली यांच्या भाषणामध्ये संरक्षण बजेटचा उल्लेख नसल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्यावर टिकेचा पाऊस पडला. अनेकांनी कोणी संरक्षण हा शब्द भाषणात ऐकलात का असा खोचक प्रश्न विचारला आहे. त्याचप्रमाणे, आमच्या आठवणीत असा प्रकार कधीच घडला नव्हता,असे बहुतेक लोकांनी सांगितले.

**सरकारी प्रतिक्रिया व देशातंर्गत उद्योगांना प्रोत्साहन :**

अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अंदाजपत्रकावर आपली प्रतिक्रिया देताना,संरक्षण खात्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदींचा आवर्जून उल्लेख केला. भारतीय लष्करातील जवानांना अत्याधुनिक शस्त्रे आणि साधनसामग्री मिळावी, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. लष्कराच्या आधुनिकीकरणाबरोबरच निवृत्त सैनिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'वन रँक, वन पेन्शन' योजनेसाठीही वाढीव निधी लागणार आहे. त्यासाठी या वाढीव निधीचा उपयोग होईल, त्याचबरोबर संरक्षण क्षेत्रातील साधनसामुग्री आणि शस्त्रनिर्मितीसाठी देशांतर्गत उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे लक्ष्य ठरविण्यात आल्याचेही मोदी म्हणाले. अर्थमंत्री अरूण जेटली यांनी संरक्षण क्षेत्राला कसल्याही प्रकारच्या निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी घोषणा केली होती. त्या घोषणेप्रमाणेच यंदा संरक्षण क्षेत्रासाठीच्या तरतुदींमध्ये त्यांनी २४ हजार ४६३ कोटींची वाढ केली आहे.

**आपतकालीन परिस्थिती व सैन्यदलांची भूमिका:**

भारतीय सैन्याकडे आपत्तकालीन परिस्थितीमध्ये लागणारे सामान हे मोठया प्रमाणात असल्यामुळे आणि सैन्यांची परंपरा ही अकस्मात आलेल्या संकटावर मात करण्याची असल्यामुळे अशा प्रकारच्या परिस्थितीमध्ये भारतीय सैन्यदले अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. आजवर देशांमध्ये घडणा-या अनेक आपत्तकालीन परिस्थितीमध्ये भारतीय सैन्याने अतिशय चांगल्या पद्धतीने मदत केलेली आहे. देशांतर्गत आपत्तीच्या काळात भारतीय सैन्याला अशा प्रकारच्या परिस्थितीमध्ये मदतीकरिता नेहमीच बोलावले जाते. यामध्ये ईशान्य भारतामध्ये किंवा काश्मीरमध्ये आणि भारताच्या इतर भागामध्ये येणारे पूर यांचा समावेश आहे. अशा पुराच्या वेळेला सैन्याकडे असलेल्या बोटी, लॉईट जॅकेट, रिकव्हरी व्हेईकल, डोजर्स, जेसीपी, पूल दुरूस्त करणारी सामग्री अशा अनेक प्रकारच्या इंजिनियरींग साधनांमुळे बचाव कार्यामध्ये मोठया प्रमाणात मदत होते. ही मदत अतिशय तत्परतेने त्या भागामध्ये पोहोचल्याने आपत्तीमध्ये होणारे नुकसान कमीत कमी राखणे शक्य होते. २0११ मध्ये सिक्कीमध्ये झालेल्या भूकंपामध्ये अशाच प्रकारे सैन्याची मदत झालेली आहे. याशिवाय भारतीय सैन्याने बांगला देश, श्रीलंका, भूतान, तसेच मालदीव, इंडोनेशिया, फिलिपाईन्स यांसारख्या लहान राष्ट्रांमध्येही तत्परतेने मदत करून आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखविली आहे. यासाठी खर्चही मोठया प्रमाणात होत असतो, म्हणून त्याचीही तरतूद करायला हवी.

**शेवट :**

मुळ मुद्दा आहे, की संरक्षणासाठी अंदाजपत्रकात उपलब्ध करून दिलेल्या निधीचा योग्य वापर होणे, तसेच सीमेवरील जवान, निमलष्करी दलातील कर्मचारी, संशोधन क्षेत्रातील वैज्ञानिक या सर्वांची क्षमता वाढवायला हवी. त्यामुळे निधीचा अधिक चांगला वापर करण्यावर भर दिला पाहिजे किंवा प्रयत्न केल्यास तो होऊ शकतो. सुदैवाने संरक्षण खात्याला ब-याच वर्षानंतर तंत्रज्ञान अवगत असलेले मंत्री लाभले आहेत. त्यांनी या प्रश्नावर लवकर निर्णय घ्यावा. देशाची सुरक्षा मनुष्यबळासह आधुनिककरण आणि तंत्रज्ञानावर अवलंबून असते. त्यात संतुलन राखले पाहिजे.

## संदर्भ सूची :

१ Thomas Raju : The Defence of India : A budgetary Perspectives.
२ Subramanyam K. : Perspectives in defence planning.
३ Laxmi Y. : Trends in India's defence Expenditure.
४ वेळोवेळी प्रसिद्ध झालेले विविध वृत्तपत्रातील वेगवेगळया विचारवंतांचे बजेटवरील लेख
५ वेबसाईट